


# मेट्रो-३ चे बॅरिकेड्स हटवण्यास सुरुवात

## २०२३च्या पावसाळ्यापूर्वी रस्ते मोकळे

अतिक शेख/मुंबई

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ च्या कामासाठी रस्त्या-रस्त्यात बॅरिकेड्स टाकले आहेत. यामुळे वाहतूककोंडी होत आहे. ऑक्टोबर २०१६ मध्ये टाकलेले हे बॅरिकेड्स नोव्हेंबरपासून हटवण्यास प्रारंभ होणार आहे. येत्या वर्ष-दीड वर्षात सर्व बॅरिकेड्स टप्प्याटप्प्याने पूर्णपणे हटवले जातील, असे सूत्रांनी सांगितले.

हे बॅरिकेड्स हटवल्यानंतर पादचारी, प्रवासी, दुचाकीस्वार, दुकानदार, रहिवासी व कार्यालयांना दिलासा मिळणार आहे. या नोव्हेंबरपासून पुढील ऑक्टोबरपर्यंत बॅरिकेड्स काढण्याची प्रक्रिया टप्प्याटप्प्याने सुरू होईल. २०२३ च्या पावसाळ्यापूर्वी बहुतेक रस्ते मोकळे करण्याचा प्रयत्न आहे, तर काही ठिकाणी बॅरिकेड्स काढायला ऑक्टोबर २०२३ उजाडेल. एमएमआरसीएलच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी सांगितले.

३३.५ किमीचा हा मार्ग दोन टप्प्यात विभागला आहे. सीप्झ ते वांद्रे-कुर्ला संकुल व वांद्रे-कुर्ला संकुल ते कुलाबा असा दुसरा मार्ग आहे.

पुढील महिन्यापासून सीप्झ, मरोळ नाका, एमआयडीसी, विधान भवन स्टेशन, धारावी येथील बॅरिकेड्स काढायला सुरुवात होईल. २०२३ च्या मान्सूनपूर्वी सीप्झ, एमआयडीसी, सहार रोड, सांताक्रुझ, कालिना, बीकेसी व धारावी स्टेशन येथील बॅरिकेड्स काढले जातील.